पुराभिलेख संचालनालय
महाराष्ट्र शासन
( पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग )
दूरध्वनी - कार्यालय- २२८४३९७१, २२८४४२६८, १५६, सर कावसजी जहांगीर रेडीमनी इमारत, महात्मा गांधी मार्ग,काळा घोडा, फोर्ट, मुंबई-४०००३२
Email : mumbaiarchives@gmail.com

जा. क्र. पुरा. संचा./संकलन/नाशन/२०२५/बी-३५७५ दिनांक:-09 APR 2025

विषय: - अभिलेख नष्ट करताना अंमलात आणावयाची कार्यपध्दत.
संदर्भ: - १) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५,
२) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००७.

## परिपत्रक

संदर्भिय अधिनियम व नियमानुसार शासकीय / निमशासकीय कार्यालयाकडून ब वर्गीय अभिलेख नष्ट करण्यापूर्वी संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे नष्ट करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करीत असतात.

पुराभिलेख संचालनालयास प्राप्त प्रस्तावांमध्ये ब-याचदा नस्ती क्रमांक नसणे, विषय अपूर्ण असणे, नस्ती बंदची तारीख नसणे, नष्ट करण्याचे वर्ष नमूद केलेले नसणे, ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे अभिलेख नसून त्याची भविष्यात या कार्यालयास गरज भासणार नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र जोडलेले नसल्याभूळे नष्ट करण्यास मान्यता देणे या संचालनालयास अडचणीचे होत आहे.

सबब खालील कार्यपध्दतीचा अवलंब करुनच नष्ट करावयाच्या अभिलेखाची यादी पुराभिलेख संचालनालयाकडे पाठविण्यात यावी.

१) केवळ मुदतबाह्य "ब" वर्गीय अभिलेखांची यादी या संचालनालयास पाठविण्यात यावी.
२) मुदतबाह्य "क" व "ड" वर्गीय अभिलेख आपल्या स्तरावर निर्णय घेऊन नष्ट करावयाचा असल्यामूळे त्याच्या याद्या या संचालनालयास पाठविण्यात येऊ नये.
३) नस्तीचा क्रमांक नोंदविण्यात यावा.
४) नस्तीचा विषय संक्षिप्त स्वरुपात न लिहीता विस्तृत स्वरुपात असणे आवश्यक आहे.
५) नस्ती बंद केल्याचा दिनांक नमूद करण्यात यावा.
६) नष्ट करावयाचे वर्ष नमूद करण्यात यावे.
७) या संचालनालयास पाठविण्यात येणा-या अभिलेखाची यादी ही पृष्ठांकीत असणे आवश्यक आहे.
८) मुदतबाह्य नसलेल्या नस्त्यांची यादीत नोंद घेण्यात येऊ नये.
९) सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील प्रत्येक पृष्ठावर विभाग/कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.
१०) नाशनासाठी सादर केलेल्या यादीतील अभिलेख हे ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे नसून त्याची भविष्यात या कार्यालयास गरज भासणार नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक असून त्यावर शासकीय मोहोर असणे आवश्यक आहे.
११) नष्ट करावयाच्या नस्त्यांच्या यादीचा नमुना परिशिष्ट एक मध्ये या परिपत्रकासोबत देण्यात आला आहे.
१२) यादीसोबत सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा मसुदा परिशिष्ट दोन मध्ये या परिपत्रकासोबत जोडण्यात आला आहे.

उपरोक्त नुसार कार्यवाही करुन "ब" वर्गीय अभिलेख नष्ट करण्यापूर्वी मान्यतेसाठीचा प्रस्ताव पुराभिलेख संचालनालयास सादर करण्यात यावा.

संचालक
पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सोबत:- परिशिष्ट -एक व दोन.

प्रति,
१) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
२) मंत्रालयीन सर्व विभाग,
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
४) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
५) आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
६) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
७) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,
८) आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग,
९) आयुक्त, भूमि अभिलेख,
१०) आयुक्त, परिवहन विभाग,
११) आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास,
१२) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना,
१३) आयुक्त, सहकार विभाग,
१४) आयुक्त, मत्स्य व्यवसाय,
१५) आयुक्त, कृषि विभाग,
१६) आयुक्त, आदिवासी विकास,
१७) पोलिस महासंचालक, मुंबई,
१८) सर्व विभागीय महसूल आयुक्त,
१९) सर्व आयुक्त, महानगर पालिका,
२०) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर,
२१) सर्व कृषि संचालक,
२२) सर्व वन संरक्षक,
२३) सर्व पोलिस आयुक्त,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२६) सर्व संचालक, संचालनालय,
२७) सर्व अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
२८) सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक,
२९) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
३०) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
३१) सर्व जिल्हा निबंधक.

परिशिष्ट -एक

"ब" वर्गीय नष्ट करावयाच्या नस्त्यांची यादी

विभागाचे नाव

| अ. क्र. | नस्ती क्रमांक | विषय | नस्ती बंद केल्याचा दिनांक | वर्गीकरण | नष्ट करण्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |

विभाग/कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

परिशिष्ट -दोन

## प्रमाणपत्र

सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील अनुक्रमांक ०१ ते ---- पर्यंतच्या एकूण ------ नस्त्यांचे महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम २००७ मधील ९ (१) नुसार पुर्नविलोकन करण्यात आले आहे. त्यात ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे अभिलेख नसून त्याची भविष्यात या कार्यालयास त्याची गरज भासणार नाही. याकरिता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण

दिनांक

विभाग/कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

शासकीय मोहोर